| | | |
|---|---|---|
| शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, नागाळा पार्क कोल्हापूर | | |
| फोन नं.-(0231) 2650781<br>Gmail ID-ssakolhapur1@gmail.com | जा.क्र.कोजिप/शिक्षण/प्राथ/वशि-१९/बदली /२०२४<br>शिक्षण विभाग(प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>दिनांक :-१६/०६/२०२४ | |

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती -------------(सर्व)

विषय :-सन २०२४ प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्या करणेसाठी अंतिम यादी प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :-इकडील पत्र क्रं. कोजिप/शिक्षण/काचि-१९/जिल्हांतर्गत बदली/२०२४ दिनांक १४/५/२०२४

उपरोक्त संदर्भित विषयास अनुसरुन्, शालेय शिक्षण विभागाकडील दिनांक २१/६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हांतर्गत बदलीसाठी जे शिक्षक पूर्वीपासून कार्यरत आहेत,त्यांच्या पैकी बदली इच्छुक शिक्षकांना त्यांच्या विकल्पानूसार एक संधी देवून जागा रिक्त असल्यास समुपदेशनद्वारे रिक्त पदी नियुक्ती देण्यात यावी. समुपदेशनपूर्वी संभाव्य भरण्यात येणारी नविन पदे विचारात घ्यावी व शाळास्तरावर समान शिक्षक राहतील याची दक्षता घेणेबाबत आदेश आहेत. त्यास अनुसरुन सर्व गटाकडून प्राप्त बदलीपात्र शिक्षकांची यादी दिनांक १४/५/०२४ च्या पत्रान्वये प्रसिध्द करणेत आली होती.

सदर यादीवर शिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपावर तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी , जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व अंतिमत: मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणी घेवून आक्षेप मान्य /अमान्य केले आहेत.

दिनांक १२/६/२०२४ रोजी मराठी/उर्दू माध्यम संवर्ग १ ते संवर्ग ४ च्या मुख्याध्यापकांच्या बदल्या झालेल्या आहेत.दिनांक १९/६/२०२४ पासून मराठी/ उर्दू माध्यम परवीधर अध्यापक /विषय् शिक्षक व अध्यापकांच्या बदल्या मेन राजाराम हायस्कूल कोल्हापूर येथे होणार आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्रं. | दिनांक | संवर्ग | बदलीतील अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १९/६/२०२४ | संवर्ग १ | सर्व |
| २ | दिनांक २०/६/२०२४ | संवर्ग २ व संवर्ग ३ | सर्व |
| | | संवर्ग ४ विषय शिक्षक | सर्व |
| ३ | दिनांक २१/६/२०२४ | संवर्ग ४ अध्यापक | अनुक्रमांक ०१ ते सर्व १००० |
| ४ | दिनांक २२/६/२०२४ | संवर्ग ४ अध्यापक | अनुक्रमांक १००१ ते सर्व |

यासोबत प्राथमिक शिक्षकांची जिल्हातंर्गत बदल्या करणेबाबत मराठी /उर्दू माध्यम पदवीधर अध्यापक/विषय शिक्षक व अध्यापक यांची अंतिम यादी जिल्हा परिषद वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येत आहे. तरी वर नमूद केले वेळापत्रकाप्रमाणे संबंधित संवर्गातील विषय शिक्षक/पदवीधर शिक्षक व अध्यापकांना बदलीसाठी संबंधित तारखेस विहीत वेळेत मेन राजाराम हायस्कूल,भवानी मंडप कोल्हापूर येथे उपस्थित राहणेसाठी आपले स्तरावरुन कळवणेत यावे.

मीना शेंडकर
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner